# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

**धनकेश्वर नगर, वाशिम रोड, पोस्ट पार्डी, पुसद, जि. यवतमाळ ४४५ २१५**

मो. क्र. ९९६०३ ६६३०३,, इमेल –pusad.wh@mswc.in


## जाहीर लिलाव

सर्व जनतेस कळविण्यात येते की, पोलिस स्टेशन पुसद शहर यांनी अपराध क्र. ११७/२०१० भादंविचे धारा ४२०, ४६८, ४६९, ४७१ व इतरही कलमासह दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये पंचनाम्याद्वारे ६२३ कापूस गाठी जप्त करण्यात आलेल्या आहेत. त्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुसद येथील गोदाम क्रमांक OU०२ मध्ये ५२३ व OU०४ मध्ये अर्धजळीत १०० अशा एकुण ६२३ कापूस गाठी जप्त करुन ठेवलेल्या आहेत. सदर कापूस गाठींची कोणीही मागणी केलेली नाही / मालकी हक्क दाखविला नाही. त्यामुळे त्या विनाकारण गोदामात पडून आहेत. त्यामुळे **महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**, **धनकेश्वर नगर**, **वाशिम रोड**, **पुसद** यांनी विद्यमान जिल्हा न्यायाधीश, पुसद यांचेकडून दिनांक ०१ जानेवारी २०२४ रोजी वरील जप्त असलेल्या कापूस गाठी लिलावाद्वारे विक्री करण्याची परवानगी प्राप्त केली आहे. सदरची लिलाव प्रक्रिया हि मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, पुसद यांचे नियंत्रणाखाली / पर्यवेक्षणाखाली करायची आहे.

त्याअर्थी या जाहीर लिलावाद्वारे कळविण्यात येते की, सदर जप्त असलेल्या कापूस गाठी दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी **महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**, **पुसद** वखार केंद्र येथे गोदामामध्ये वेळ दुपारी ३ वाजता कापूस गाठी ज्या स्थितीत आहेत, जेथे आहेत, त्या स्थितीत (as is where is basis) या अटीवर जाहीर लिलाव बोली पद्धतीने विक्री करणे आहे. त्याअर्थी ईच्छुक खरेदीदारांनी वरील तारखेला वेळेत हजर राहून, लिलावात सहभागी होवून, सदर गाठींची बोली बोलावी लागेल.

कापूस गाठींची बोली प्रती क्विंटल अथवा प्रती किलो दराने (जी लिलावाचे वेळी ठरविण्यात येईल) त्यानुसार बोलली जाईल. जाहीर लिलावात ज्या खरेदीदारांकडून सर्वात जास्त रकमेची (H१) बोली बोलली जाईल, ती रक्कम अंतिम ठरवली जाईल; अशा खरेदीदाराने बोलीनुसार कापूस गाठीच्या वजनाच्या परिमाणानुसार १०% इतकी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा "विद्यमान जिल्हा न्यायाधीश, पुसद" यांचे नावे देय असलेल्या धनाकर्ष (Demand Draft) द्वारे लिलाव प्रक्रीया पार पडल्यानंतर बँकेच्या व कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसाचे आत म. रा. वखार महामंडळ, पुसद वखार केंद्र यांचेकडे जमा करणे बंधनकारक राहील. तद्नंतर पुढील १२ दिवसाचे आत लिलावामध्ये बोलली गेलेली संपूर्ण रक्कम कापूस गाठीच्या वजनाच्या परिमाणानुसार (वजनानुसार) (+) अधिक ५% (रक्कम) वस्तू व सेवा कर(GST) अशी एकत्र रक्कम विद्यमान जिल्हा न्यायाधीस, पुसद यांचे नावाचा धनाकर्ष साठा अधिक्षक, पुसद यांचेकडे जमा करून त्वरित कापूस गाठींची उचल करावी लागेल. कापूस गाठींची उचल करण्यासाठी येणारा सर्व खर्च (जसे की वाहतूक, हमाली, वजन काटा इत्यादी) खरेदीदारास करावा लागेल. (H१) यांनी १२ दिवसांमध्ये कापूस गाठींची गोदामातून उचल न केल्यास (H१) यांनी महामंडळाकडे जमा केलेली १०% रक्कम जप्त करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

या जाहीर लिलावातील कापूस गाठींची विक्री प्रक्रिया किंवा बोली बोललेले दर कोणतेही कारण न दर्शविता, रद्द करण्याचा अंतिम अधिकार मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, पुसद यांनी राखून ठेवला आहे. सुट्टीचा दिवस वगळून कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत वरिल वर्णन केलेल्या कापूस गाठी वखार केंद्रावर पाहण्यास मिळतील. खरेदीदारांनी कापूस गाठींची पाहणी व खातरजमा करूनच लिलावात भाग घ्यावा. प्रत्यक्ष जावक घेतांना साठ्याचा दर्जा किंवा इतर कुठलाही वाद उपस्थित करता येणार नाही. याची नोंद घ्यावी. अधिक माहितीकरीता साठा अधिक्षक, पुसद (मो.क्र.९९६०३६६३०३) यांचेशी संपर्क साधावा.

करिता जनतेला जाहीरपणे कळवित आहे.

-स्वाक्षरित-
साठा अधिक्षक
म. रा. वखार महामंडळ, पुसद

स्थळ : पुसद
दिनांक: २८/११/२०२४

**MAHARASHTRA STATE WAREHOUSING CORPORATION**
**(Govt. undertaking public enterprise)**
**Dhankeshwar Nagar, Washim Road, Post Pardi,**
**Pusad, Dist. Yavatmal-445 215**
**Mo. No. 99603 66303, Email:- pusad.wh@mswc.in**

# PUBLIC AUCTION

It is hereby informed to all the public that, Police Station Pusad City has registered a case under Sections 420, 468, 469, 471 and other sections of the IPC, in above offense 623 no. of cotton bales have been seized through Panchnama. They have been seized and stored in godowns of Maharashtra State Warehousing Corporation, Pusad i.e. 523 bales in godown no. OU02 & semi burn condition 100 bales in OU04 total 623 cotton bales seized and stored. No any has demanded and not shown ownership in the said cotton bales. Therefore, they are lying in the godown without reason. **Maharashtra State Warehousing Corporation, Dhankeshwar Nagar, Washim Road, Pusad** has obtained permission from the Hon'ble District Judge, Pusad to sell the above seized cotton bales through auction on 01 January 2024. The said auction process is to be done under the supervision and control of Hon'ble Tahsildar & Taluka Magistrate, Pusad.

It is hereby notified that the said seized cotton bales will be sold by public auction on 13 January 2024 at 03:00 pm at the Maharashtra State Warehouse Corporation, Pusad. On the condition that the cotton bales are as it is condition and where is, (i.e. as is where is basis). Accordingly, the interested purchasers/buyers should attend the auction on time on the above date and participate in the auction and buy the said cotton bales through bidding.

The biding will proceed by per quintal or per Kg (which will be decided at the time of the auction). The highest amount (H1) of the bid in the public auction will be decided as final; Such buyer shall deposit 10% amount of the weight of cotton bales stock, through a Demand Draft of a nationalized bank payable to the "Hon'ble District Judge, Pusad" within 3 working days of the bank and office after the auction process completion. Thereafter, the entire bid amount in the auction (+) and an extra 5% amount of GST deposited to the Storage Superintendent, Pusad by the name of "Hon'ble District Judge, Pusad" in the form of a Demand Draft within 12 days and the goods shall be lifted immediately. All expenses such as transportation, handling, weighing etc. shall be borne by the buyer. If (H1) does not lift the Cotton bales within 12 days, then 10% deposited of (H1) will forfeited.

The Hon'ble Tahsildar & Taluka Magistrate, Pusad reserves the final right to reject the sale of cotton bales in this public auction process or any bid without assigning any reason. The above mentioned cotton bales are available for verification at the warehouse during office hours on any day except holidays. The buyers should participate in the auction after the verification and confirmation of cotton bales. Please note that, no any dispute regarding the quality or any issue raised while taking the delivery of cotton bales. For further information, please contact the Storage Superintendent, M. S. Warehousing Corporation, Pusad (Mo.No. 9960366303).

Therefore, announced for the public at large.

-Sd-
Storage Superintendent
M. S. Warehousing Corporation, Pusad

Place : Pusad
Date : 28/11/2024